05 JAN 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरु अरुण पाटील : शिवाजी विद्यापीठातील सीएफसी अंतर्गत कार्यशाळेचा प्रारंभ

# सोनकवडे यांचे समाजोपयोगी संशोधन आदर्शवत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आयआयटी मुंबईनंतर अकृषी विद्यापीठात एकमेव कॉमन फॅसिलिटेशन सेंटर (सीएफसी सेंटर) शिवाजी विद्यापीठात आहे. या सेंटरचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे समाजोपयोगी संशोधन आदर्शवत आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील सीएससी सेंटरमध्ये स्ट्राइड प्रोग्राम आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के,तर आयसीटी मुंबईचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित, एनआयटीचे माजी अधिष्ठाता एस. के. चक्रवर्ती, कार्यशाळेचे समन्वयक व सैफ सेंटरचे संचालक डॉ. सोनकवडे, डॉ. ज्योती जाधव, के. डी. सोनवणे प्रमुख उपस्थित होते. सध्या संशोधन क्षेत्रात शोधनिबंध प्रसिद्धीवर जास्त भर दिला जातो. एकदा शोधनिबंध प्रसिद्ध झाले की, संशोधन कागदावरच राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संशोधन हे समाजोपयोगी असावे.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सीएफसी सेंटरमध्ये घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अरुण पाटील यांचे हस्ते अ‍ॅटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप कार्यान्वित करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. आर. जी सोनकवडे, के. डी. सोनवणे, ज्योती जाधव उपस्थित होते.

आपल्या संशोधनाला व्यापार, व्यवसायपूरकतेसाठी विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थ्यांनी इंडस्ट्रीला लागणारे कुशल तंत्रज्ञान अवगत करणे गरजेचे आहे, तरच उद्योग आणि विद्यापीठामध्ये समतोल साधता येईल, असे कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. विद्यापीठातील सीएफसी सेंटर विद्यार्थी, औद्योगिक क्षेत्रासाठी खुले आहे. या सेंटरमध्ये डॉ. सोनकवडे यांनी नवनवीन उपकरणे कार्यान्वित केली असून त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. डॉ. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यशाळेत एनसीएल पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पोदार, पार्क सिस्टिमचे शास्त्रज्ञ डॉ. आशुतोष वलवडे, डॉ. तुषार भावसार यांनी मार्गदर्शन केले.

## सॅनिटायझेशन टनेल, युव्ही टॉर्चद्वारे आधार

डॉ. सोनकवडे यांनी संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. कोरोना काळात त्यांनी सॅनिटायझेशन टनेल, युव्ही टॉर्च, तारा रोबोटची निर्मिती करून लोकांना आधार देण्याचे काम केले.

05 JAN 2022 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विट्यातील बळवंत कॉलेजचे युवा महोत्सवामध्ये यश

लोकसत्ता प्रतिनिधी



युवा महोत्सवात विद्यार्थिनींनी सादर केलेले पारंपरिक समईनृत्य.

**सांगली :** सांगलीवाडीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या ४१ व्या जिल्हा स्तरीय युवा महोत्सवामध्ये विट्यातील बळवंत कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी लोकसंगीतामध्ये पहिला क्रमांक पटकावला. गेल्या वर्षी करोनामुळे महाविद्यालयीन युवकांना कला सादर करण्याची संधीच मिळाली नव्हती. यंदा अत्यंत उत्साहात युवा महोत्सव पार पडला.

डॉ. कदम महाविद्यालयाने यंदाच्या युवा महोत्सवाचे यजमान पद प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे यांना देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले. लोकसंगीत व लोककला या गटामध्ये विट्याच्या बळवंत कॉलेजने पहिला, तर इस्लामपूरच्या वायसी कॉलेजने दुसरा व कासेगावच्या कॉलेजने तिसरा क्रमांक पटकावला. समूहगीतामध्ये पलूस कॉलेजने पहिला, कुसुमताई पाटील कॉलेज इस्लामपूरने दुसरा व विलिंग्डन कॉलेजने तिसरा नंबर मिळवला. नकला प्रकारामध्ये इस्लामपूरच्या वायसी कॉलेज या एकमेव कॉलेजने पहिला क्रमांक पटकावला.

मराठी वक्तृत्वामध्ये विश्वासराव नाईक कॉलेज शिराळा प्रथम, डॉ. कदम महाविद्यालय द्वितीय आणि पलूस कॉलेज तृतीय, हिंदी वक्तृत्व- प्रथम-कुसुमताई पाटील, कॉलेज इस्लामपूर, द्वितीय- मिरज महाविद्यालय आणि तृतीय-नाईक कॉलेज चिखली, इंग्रजी वक्तृत्व- प्रथम- आरआयटी, साखराळे, द्वितीय-केडब्ल्युसी, सांगली, तृतीय- गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली. पथनाट्यमध्ये प्रथम- सायसी कॉलेज इस्लामपूर, द्वितीय- डॉ. कदम महाविद्यालय, सांगली आणि तृतीय- वसंतदादा कॉलेज तासगाव.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप कार्यान्वित करताना घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ अरुण पाटील. डॉ. आर. जी सोनकवडे, डॉ. सोनवणे, डॉ. ज्योती जाधव.

# विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संशोधनाचा ध्यास घ्यावा : कुलगुरू डॉ. पाटील

**कोल्हापूर :** सध्या संशोधन क्षेत्रात शोधनिबंध प्रसिद्धीवर जास्त भर दिला जातो. एकदा शोधनिबंध प्रसिद्ध झाला की, संशोधन कागदावरच राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संशोधनाचा ध्यास घ्यायला हवा, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'सीएफसी' अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेत एनसीएल पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पोदार, पार्क सिस्टीमचे शास्त्रज्ञ डॉ. आशुतोष वलवडे, कस्टमर सपोर्ट मॅनेजर डॉ. तुषार भावसा, समन्वयक प्रा. डॉ. आर.जी. सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले.

पुढारी

# व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी १३ पर्यंत अर्जाची मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर केल्या आहेत. विद्यार्थ्यांना महाविद्यालय व पदव्युतर अधिविभागात १३ जानेवारीपर्यंत विनाविलंब शुल्क ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करण्याची मुदत १५ जानेवारीपर्यंत आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

05 JAN 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलापुरी मी फिरूनी जन्म घेते!

## सिंधुताईंचे कोल्हापूरशी होते अनोखे नाते

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

'ही लाखमोलाची करवीरनगरी, पुण्याई पदरी बांधूनी घेते, या कलापुरी मी फिरूनी जन्म घेते...' अशा काव्यपंक्तीने सुरुवात करीत 'मी कोल्हापूरची असावी असे वाटते', अशा गौरवोद्‌गाराने अनाथांची माय, ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांनी कोल्हापूरशी असलेल्या नात्याचा उलगडा केला.

अनाथांसाठी आयुष्य वेचलेल्या सिंधुताई सपकाळ यांचे पुण्यात निधन झाले. कोल्हापूरशी त्यांचे ऋणानुबंध होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या कोल्हापुरात येत असत. त्यांच्या निधनाने कोल्हापूरशी असलेल्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. ३ सप्टेंबर २०१५ रोजी शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समिती, सामाजिक वंचितता व सर्वसमावेशक धोरण अभ्यास केंद्र, विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे व्याख्यानासाठी सिंधुताई आल्या होत्या. तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्याहस्ते समाजकार्यासाठी त्यांना २० हजार रुपयांची देणगी प्रदान करण्यात आली. गर्दीने खचाखच भरलेल्या सभागृहाबाहेर सिंधुताईंचे भाषण ऐकण्यासाठी स्क्रीन लावण्यात आला होता. विद्यार्थ्यांशी संवाद साधत सिंधुताई यांनी जीवनातील हालअपेष्टा, संघर्षाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

पुस्तकी शिक्षणापेक्षा व्यावहारिक शिक्षण खूपच वेगळे आहे. दुसऱ्यांच्या दु:ख, वेदना समजून घेऊन त्यावर फुंकर मारण्याची ऊर्जा शिक्षणातून मिळते. स्वत:साठी न जगता समाजासाठी जगल्यास जीवन सार्थकी लागते. मरण्यापेक्षा मरणाऱ्यांसाठी जगण्याचे बळ परिस्थितीने दिले. कोणाला तरी प्राप्त करण्यासाठी काहीतरी करणे हे प्रेम नव्हे. खरे प्रेम त्यागातच आहे. तरुणाईने समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचून मानवी मूल्यांची जोपासना करावी, असा अनमोल संदेश सिंधुताई यांनी विद्यार्थ्यांना दिला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

### मगर दिल नही मिलता

'किसे अपना बनावू, कोई काबील नहीं मिलता, पत्थर बहुत मिलते है, मगर दिल नही मिलता' या शायरीतून सिंधुताई यांनी जीवनातील खडतर प्रवास सांगितला. जगण्याचा संघर्ष सुरू असताना रुकडी (ता. हातकणंगले) स्टेशनवर काही दिवस भीक मागितली. या परिसराने मला जगविले. त्यानंतर मी अनाथांसाठी काम सुरू केले. त्यावेळच्या काही नगरसेवकांनी अंबाबाई मंदिरात माझ्या हस्ते झुणका-भाकरीचे वाटप केले हा जीवनातील हृदयस्पर्शी प्रसंग असल्याचे त्यांनी भाषणात सांगितले. त्यावेळी सभागृहातील प्रत्येकजण भावूक झाला होता.

05 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी विठ्ठल शिंदेंच्या कार्याकडे डोळसपणे पाहावे : डॉ. शिंदे

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनकार्याकडे नव्या पिढीने डोळसपणे पाहणे गरजेचे आहे. महर्षी शिंदे यांनी समाजासाठी त्यागी वृत्तीने कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा, आदर्श नव्या पिढीने घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

येथील शिवराज महाविद्यालयात कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यान, स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांचा सत्कार व कर्मवीर पुरस्कार प्रदान कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते.




गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. रणधीर शिंदे. सोबत प्रा. किसन कुराडे, एस. एम. कदम यांच्यासह अन्य.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. श्रद्धा पाटील यांनी करून दिला. दीपाली इंगळे हिने देशभक्तिपर गीत सदर केले.

महर्षी शिंदे यांच्या जीवनावरील डॉ. रंगराव हेंडगे लिखित 'कर्ते सुधारक' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गडहिंग्लज तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक कित्तूरच्या राणी चन्नम्माचे वंशज, म. दुं. श्रेष्ठी, अनंतराव तेलवेकर, बी. एस. पाटील, बंडाप्पाण्णा घुगरे, आनंदराव चव्हाण, नानासाहेब शिंदे, दुंडाप्पा चौगुले, नारायण काळगे, पराप्पा आरबोळे, इब्राहिम मकानदार यांच्या वारसांचा सत्कार करण्यात आला. दीपक मनगुतकर, डॉ. रणधीर शिंदे व भाऊसाहेब आजबे यांचा सत्कार, तसेच कर्मवीर गुणवंत शिक्षक पुरस्कार डॉ. महेश चौगुले व कर्मवीर गुणवंत प्रशासकीय कर्मचारी पुरस्कारी मोहन शिंदे यांना देण्यात आला.

यावेळी प्रा. किसनराव कुराडे, सचिव प्रा. डॉ. अनिल कुराडे, महेश चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष के. जी. पाटील, जे. वाय. बारदेस्कर, सुभाष धुमे, अ‍ॅड. सुरेश कुराडे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रा. सुनील शिंत्रे, एम. के. सुतार, पापा चौगुले, बिनादेवी कुराडे, अरविंद कित्तूरकर, सतीश ईटी, राजू मोळदी, प्रकाश तेलवेकर, संतोष कुरबेट्टी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. अशोक मोरमारे व श्रद्धा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठाच्या सैफ सेंटरमध्ये मंगळवारी अटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप कार्यान्वित केले. या वेळी डॉ. अरुण पाटील, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सोनवणे, डॉ. ज्योती जाधव.

# समाजोपयोगी संशोधन असावे

## डॉ. पाटील; 'अटॉमिक फोर्स' कार्यान्वित

**कोल्हापूर, ता. ४ :** शोधनिबंध प्रसिद्ध झाला की ते संशोधन कागदावरच राहते. असे संशोधन समाजोपयोगी असायला हवे. संशोधनाला व्यापार व व्यवसायपूरकता आणण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी इंडस्ट्रीला लागणारे कुशल तंत्रज्ञान अवगत करणे गरजेचे आहे, तरच इंडस्ट्री आणि विद्यापीठात समतोल साधला येईल, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी केले. त्यांच्या उपस्थितीत आज अटॉमिक फोर्स मायक्रोस्कोप कार्यान्वित केले. यावेळी ते बोलत होते.

सैफ सेंटरचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविकात कॉमन फॅसिलिटेशन सेंटरबद्दल माहिती दिली.

कुलगुरू डॉ. अनिल पाटील म्हणाले, "सध्या संशोधन क्षेत्रात शोधनिबंध प्रसिद्धीवर जास्त भर दिला जातो व एकदा का ते शोधनिबंध प्रसिद्ध झाले की संशोधन कागदावरच राहते. आयआयटीनंतर अकृषी विद्यापीठात एकमेव सैफ सेंटर शिवाजी विद्यापीठात आहे. सेंटरचे काम चांगले चालू आहे."

शिवाजी विद्यापाठीचे कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के म्हणाले, " या सीएफसी सेंटर चा उपयोग फक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी होणार नसून हे सेंटर भागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी व औद्योगिक क्षेत्रासाठी खुले आहे.'

एनसीएल पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पोदार, पार्क सिस्टीमचे शास्त्रज्ञ डॉ. आंशुतोष वलवडे, कस्टमर सपोर्ट मॅनेजर डॉ.तुषार भावसार यांनी अटॉमीक फोर्स मायक्रोस्कोपीबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस देशभरातून ३२० विद्यार्थी व शिक्षकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. असून ५० जणांनी प्रत्यक्ष तर २७० जणांनी ऑनलाईन सहभाग नोंदविला. यावेळी मुंबई आय.सी.टी चे मुंबई चे कुलगुरू डॉ.अनिरुद्ध पंडित, एनआयटीचे माजी अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. के. चक्रवर्ती, प्रा. डॉ. सोनवणे, प्रा. डॉ. ज्योती जाधव आदी उपस्थित होते.

05 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोविंदराव सासने यांचे कार्य प्रेरणादायी

## डॉ. जयसिंगराव पवार; महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे पुस्तिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. ४ :** गोविंदराव सासने यांच्यासारख्या पुरोगामी समाजसुधारकाचे कार्य 'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तिकेच्या रूपाने पुढे येत आहे. त्यांचे कार्य आजच्या पिढीला प्रेरक आहे, असे गौरवोद्गार डॉ. जयसिंगराव पवार यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित गोविंदराव सासने यांच्या आठवणी पुस्तिकेच्या प्रकाशन समारंभात आज ते बोलत होते.

'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तिकेचे प्रकाशन श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून समारंभाची सुरवात झाली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, "सासने यांच्या कार्याचा परिचय नव्या पिढीला होणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोनातून पुस्तक उपयुक्त आहे."

विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पाश्चात्य ऐतिहासिक चरित्र लेखनाबाबत विचार व्यक्त केले. डॉ. अवनीश पाटील यांनी कोल्हापूरच्या ऐतिहासिक स्थळांचे, प्रबोधन चळवळींची केंद्रस्थाने जतन करण्याचे तसेच सामाजिक चळवळी आणि दुर्लक्षित इतिहास नव्याने लोकांसमोर येण्याचे महत्त्व प्रतिपादन केले. प्रा. अजित सूर्यवंशी यांनी गोविंदराव सासने यांच्या आठवणी सांगितल्या.

सासने यांच्या कुटुंबियांपैकी प्रा. अजित सूर्यवंशी, बाळासाहेब सूर्यवंशी, स्वजिता घोडके, मेघना कामत, जया कामत उपस्थित होत्या. प्रा. प्रभंजन माने, प्रा. अरुण शिंदे, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले, तर सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : 'गोविंदराव सासने यांच्या आठवणी' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते झाले. डावीकडून डॉ. अवनिश पाटील, डॉ. रणधिर शिंदे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.**

05 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. सोनकवडे यांचे संशोधन समाजोपयोगी

## संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांचे प्रतिपादन : कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी सॅनिटायझेशन टनेल, युव्ही टॉर्च, तारा रोबोटची निर्मिती करुन लाखो लोकांना आधार देण्याचे काम केले. भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात इरमॉनचे यंत्र बसवले आहे. एकूणच सोनकवडे यांचे संशोधन समाजोपयोगी आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ अरुण पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रामध्ये स्ट्राइड प्रोग्राम आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत सीएफसी प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन केले. याप्रसंगी उदघाटक म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : इरमॉन यंत्राची पाहणी करताना डॉ. अरुण पाटील. सोबत डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. ज्योती जाधव.**

कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, डॉ. सोनकवडे यांनी अवकाशातून येणाऱ्या गॅमा किरणांचे मोज़माप करण्यासाठी ईरमॉन यंत्र शिवाजी विद्यापीठात बसवले आहे. प्रयोगशाळेत सॅनिटायझेशन टॉर्च बनवला आहे. सध्या संशोधन क्षेत्रात शोधनिबंध प्रसिद्धीवर जास्त भर दिला जातो. एकदा शोधनिबंध प्रसिद्ध झाला की संशोधन कागदावरच राहते. असे न होता आपल्या संशोधनाचा समाजाला उपयोग झाला पाहिजे. विद्यापीठातील संशोधनाच्या माध्यमातून स्थानिक व्यापार, उद्योग आणि व्यवसायाला लागणारे पूरक मनुष्यबळ विद्यापीठाने तयार केले पाहिजे. तरच इंडस्ट्री आणि विद्यापीठामध्ये समतोल साधला जाईल.

अध्यक्ष्यस्थानावरून डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील या सीएफसी सेंटरचा उपयोग फक्त विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर औद्योगिक क्षेत्रासाठी होणार आहे. सेंटरचा कार्यभार हाती घेतल्यापासून डॉ. सोनकवडे यांनी नवनवीन उपकरणे कार्यान्वित केलीत. दोन दशकांपेक्षा जास्त काळ भारत सरकारच्या उच्चशिक्षण व संशोधन विभागाच्या नियामक मंडळावर सदस्य म्हणून काम ते पाहतात, ही विद्यापीठासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. या कार्यशाळेत पुणे एनसीएलचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पोतदार, पार्क सिस्टीमचे शास्त्रज्ञ डॉ. आशुतोष वलवडे, कस्टमर सपोर्ट मॅनेजर डॉ. तुषार भावसार यांनी विद्यार्थ्यांना अटॉमिक फोर्स मायक्रोस्कोपीबद्दल मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्राचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे प्रास्ताविकात म्हणाले, कॉमन फॅसिलिटेशन सेंटरमधील उपकरणे संशोधनासाठी महत्त्वाचे आहे. यावेळी मुंबई आयसीटीचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित, एनआयटीचे माजी अधिष्ठाता प्रोफेसर एस. के. चक्रवर्ती, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. ज्योती जाधव होते.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात एएफएम प्रशिक्षण कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रामध्ये स्ट्राइड प्रोग्राम आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत ४ व ५ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. एएफएम प्रशिक्षण कार्यशाळा हा या कार्यशाळेचा विषय आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहूणे म्हणून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरूण पाटील उपस्थित राहणार आहेत. **C-MET**, पुणेचे डायरेक्टर डॉ. भरत काळे, मुंबई आयसीटीचे कुलगुरु प्रा. अनिरूद्ध पंडीत आणि महात्मा गांधी विद्यापीठ, तेलंगणाचे कुलगुरू प्रा. गोपाळ रेड्डी ऑनलाइन उपस्थिती दर्शवणार आहेत. जवळजवळ २५० संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी कार्यशाळेसाठी नोंदणी केली आहे, अशी माहिती  प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली आहे.

तरुण भारत

# 'वन्यजीव अपराध नियंत्रण'वर कुलकर्णी दांपत्याची निवड




सौरभ मुजुमदार
कोल्हापूर

वन्यजीवांशी संबंधित गुन्हे स्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'पर्यावरण वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालया'च्या अंतर्गत 'वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो' (wild life crime cantrol bureau) कार्यान्वित आहे. त्यांच्यामार्फत स्वयंसेवकांची नियुक्ती होते कोल्हापुरातील अमोल अरविंद कुलकर्णी व सौ. भक्ती अमोल कुलकर्णी या पती-पत्नींची एकाचवेळी या पदासाठी निवड झाली आहे. त्यांना तसे पत्र व ओळखपत्र मिळाले आहे.


विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र व तंत्रज्ञान विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणाऱ्या अमोल कुलकर्णी यांनी पर्यावरणशास्त्राची विशेष पदवी घेतली आहे. वन्यजीव संस्थामार्फत वन्यजीवांच्या संवर्धन व संरक्षण संदर्भात एक विशेष अभ्यासक्रम डेहराडून येथे पूर्ण केला आहे. पत्नी भक्ती या विधी कायद्याची शैक्षणिक परीक्षा देऊन सध्या एम.एस. डब्ल्यू.चे शिक्षण घेत आहेत. २०१६ पासून या क्षेत्रात कार्यरत अमोल यांनी वन, वन्यजीव विभाग, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, यांतर्गत पाणथळ दिन, गिधाड संवर्धन दिन, जलदिन, यासोबत अनेक ग्रामीण भागात विशेष शिबिरांचे आयोजन केले आहे.

ग्रामीण भागातील अनेक सेवा सुविधांपासून वंचित मुलांपासून ते प्रौढांपर्यंत या क्षेत्रात जागृतीचा त्यांचा मानस आहे. राधानगरी तालुक्यातील पडसाळीच्या देवराई बद्दल त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहेत. एखादा वन्यजीव संदर्भात गुन्हा घडल्यास त्याच्या तळापर्यंत पोहोचण्यासाठी वन खात्याला व प्रशासनाला मार्गदर्शन, वेळोवेळी त्यासंदर्भातील विविध कायद्यांची माहिती, तसेच एखादा गुन्हा घडणार असल्यास तो संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित करून थांबण्याची देखील महत्त्वपूर्ण जबाबदारी या स्वयंसेवकांवर असते.

वन्यजीव अपराध नियंत्रण ब्यूरो हा विभाग ६ जून २००७ पासून कार्यान्वित असून त्याच्या अंतर्गत काम करण्याची अशी पती-पत्नींची एकाच वेळी कोल्हापूर जिल्ह्यातील निवड झालेली ही पहिलीच वेळ असावी. पर्यावरणाबद्दल प्रचंड आस्था, वन्यजीवांबाबत आत्मीयता, समाजामध्ये जनजागृती, काळ वेळ न पाहता कार्यरत राहणे, अप्रत्यक्षरीत्या ही पात्रता असणारी व्यक्ती या पदासाठी काम करू शकते.

केवळ पर्यटन म्हणून अभयारण्य, जंगल, व वन्यजीव याकडे न पाहता त्यांचे संरक्षण, दीर्घकाळ त्यांचा अधिवास, अस्तित्व कसे सुरक्षित राहील व पर्यावरणाचा योग्य समतोल यासाठी हा विभाग आजही कार्यरत आहे.

तरुण भारत




कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील कॉमर्स विभागाच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. सोबत डॉ. ए. एम. गुरव, उद्योजक पल्लवी कोरगावकर, प्रा. पी. सी. पारिशवाड आदी.

# सामाजिक जाणिवेतून उद्योजक बनावे

- कोरगावकर ग्रुपच्या सीईओ पल्लवी कोरगावकर यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी सॉफ्ट स्किल्स, कौशल्य विकास करण्यावर भर दिला पाहिजे. कोणताही व्यवसाय, उद्योग सुरू करताना सामाजिक जाणीवेतून सुरू केला पाहिजे, असे मत कोरगावकर ग्रुपच्या सीईओ पल्लवी कोरगावकर यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील कॉमर्स विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'उद्योजकता विकास व कक्ष" या विषयावर त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठातील कौशल्य आणि उद्योजकता विकास कक्षाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, विद्यार्थ्यांनी कृषी उद्योजकता हा विषय निवडून शेतीला प्राधान्य दिले आहे. शेती क्षेत्रातही रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. प्रा. पी. सी. पारिशवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रतिक पाटील यांनी आभार मानले. अर्चना चव्हाण यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी कॉमर्स विभागप्रमुख प्रा. एस. एस. काळे, डॉ. रेवती पाटील, प्रा. यु. डी. दबडे, प्रा. वाय. बी. माने, डॉ. सोमनाथ काळे, प्रा. व्ही. बी. पुजारी आदी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी झाली. मुख्य प्रशासकीय भवनात प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. परिक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. एम.व्ही. वाळवेकर, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे, अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 5 JAN 2022
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर कॉलेजकडे शिवाजी विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

अटीतटीने खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यातील अखेरच्या चेंडूवर महत्वपूर्ण धाव घेत जयमान महावीर कॉलेजने नाईट कॉलेजला पराभूत करत शिवाजी विद्यापीठ आतंरविभागीय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. कागलमधील शाहू क्रिडांगणावर झालेल्या या स्पर्धेचे महावीर कॉलेजचे आयोजन केले होते.

स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात नाईट कॉलेजने कॉमर्स कॉलेजचा ५० धावांनी तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात महावीर कॉलेजने इस्लामपूरच्या राजारामबापू पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीचा ७ गडी राखून पराभव करत अंतिम फेरी गाठली होती. अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना नाईट कॉलेजने ४० षटकात २१४ धावा केल्या होत्या. यामध्ये अनिकेत नलवडे व अथर्व शिंदे यांनी चांगली फलंदाजी करत संघाची धावसंख्या द्विशतकी करण्यांत मोलाचा वाटा उचलला. महावीरच्या निखिल कदम व शुभम माने यांनी भेदक मारा करुन प्रत्येकी दोन बळी मिळविले. महावीर कॉलेजची सुरुवात खराब झाली होती. पण तरीही राज पाटीलने ७७, प्रथमेश कारंडे व अंकीत मुखर्जी यांनी प्रत्येकी २२ धावा करुन सामना विजयाच्या दिशेने पाऊल टाकले. सामना जिंकण्यासाठी महावीरला अखेरच्या षटकांत ९ धावांची गरज होती. हर्षजीत पाटील व शुभम वाडकर यांच्या जोडीने मात्र संयमी फलंदाजी करत महावीरला सामना जिंकून देत स्पर्धेच्या विजेतेपदावर विराजमान केले. महावीर कॉलेजला प्रतिष्ठेची ढाल देऊन गौरवण्यात आले. विजयी महावीरच्या संघाला संस्थेचे चेअरमन ॲड. कापसे, कार्यवाह एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे व प्रा. डॉ. बाबासो उलपे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आतंरविभागीय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावलेल्या महावीर कॉलेज संघासोबत प्रा. डॉ. बाबासो उलपे, प्रा. डॉ. रोहित पाटील व प्रा. स्वप्निल खोत आदी.**